Literacy for a Billion

Movie: Mee Sindhutai Sakpal
Year: 2010

Song: Itakech Mala Jatana
Lyricist:

इतकेच मला जाताना
इतकेच मला जाताना
सरणावर कळले होते
मरणाने केली सुटका
मरणाने केली सुटका
जगण्याने छळले होते
इतकेच मला जाताना
याचेच रडू आले की
जमले न मला रडणे ही
याचेच रडू आले की
जमले न मला रडणे ही
मी रंग तुझ्या स्वप्नांचे
मी रंग तुझ्या स्वप्नांचे
अश्रूत मिसळले होते
इतकेच मला जाताना

घर माझे शोधाया मी
वाऱ्यावर वणवण केली
घर माझे शोधाया मी
वाऱ्यावर वणवण केली
जे दार खुले दिसले ते
जे दार खुले दिसले ते
आधीच निखळले होते
इतकेच मला जाताना

मी एकटीच त्या रात्री
आशेने तेवत होते
मी एकटीच त्या रात्री
आशेने तेवत होते
मी विझले तेव्हा सारे
मी विझले तेव्हा सारे
आकाश उजळले होते
इतकेच मला जाताना
सरणावर कळले होते
मरणाने केली सुटका
जगण्याने छळले होते
इतकेच मला जाताना

ही दुनिया पाषाणाची
बोलून बदलली नाही
ही दुनिया पाषाणाची
बोलून बदलली नाही
मी बहर इथे शब्दांचे
मी बहर इथे शब्दांचे
नुसतेच उधळले होते
इतकेच मला जाताना

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*